पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

क प्रभाग समिती

कार्यपत्रिका क्रमांक- १

स भा वृ त्तां त

दिनांक १०-४-२०१५ वेळ-दुपारी १२.५० वाजता

----------------------- -----------------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीच्या सभापती पदाचे निवडीची विशेष सभा शुक्रवार दि. १०/०४/२०१५ रोजी दुपारी १२.५० वाजता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील "**महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृह" पिंपरी चिंचवड महापालिका, पिंपरी-१८**. येथे मा.श्री. ओमप्रकाश बकोरीया पिठासिन अधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका,पुणे. यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती.सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.ननवरे जितेंद्र बाबा
२) मा.भोसले राहूल हनुमंतराव
३) मा.पालांडे सुजाता सुनिल
४) मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
५) मा.गिता सुशिल मंचरकर
६) मा.शितोळे शैलजा बाबुराव
७) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
९) मा.प्रशांत शितोळे
१०) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११) मा.मोटे किरण बाळासाहेब
१२) मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.दत्तात्रय फुंदे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.उल्हास जगताप- नगरसचिव,मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त,- (पिठासीन अधिकारी)** सन्मा.सदस्य, मा. क्षेत्रीय अधिकारी , उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो. आजच्या सभेत प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे. मुक्त व निर्भयपणे मा. क प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद बरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे. सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी सूचना करतो.

**मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)** -मा. क प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण **०२** उमेदवारांची **०२** नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | सूचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | मा.सौ.गीता सुशिल मंचरकर | मा.राहुल हनुमंतराव भोसले | मा.सौ.शकुंतला काशिनाथ बनसोडे |
| २ | मा.मोटे किरण बाळासाहेब | मा.ननवरे जितेंद्र बाबा | मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी |

(मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त **०२** उमेदवारांची **०२** नामनिर्देशनपत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केले. मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (पिठासीन अधिकारी)** – मा. क प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एकूण **२** उमेदवारांच्या **२** नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आली असून ०२ नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **१) मा.सौ.गीता सुशिल मंचरकर २) मा.मोटे किरण बाळासाहेब** हे **दोन** रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांना त्यांची उमेदवारी मागे घेता येईल.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी १२.५१ ते १.०६ हा १५ मिनिटांचा कालावधी संपला.)

**मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त(पिठासीन अधिकारी** - उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटाच्या अवधीमध्ये मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.सौ.गीता सुशिल मंचरकर** यांनी दिलेल्या वेळेमध्ये उमेदवारी मागे घेतली असल्याने **मा.मोटे किरण बाळासाहेब** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक- ११० विषय क्रमांक- १
दिनांक- १०/४/२०१५ विभाग- प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माक प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता १) **मा.सौ.गीता सुशिल मंचरकर** २) **मा.मोटे किरण बाळासाहेब** या दोन उमेदवारांनी प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ०२ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल केलेली असून दोन्ही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामधील उमेदवार **मा.सौ.गीता सुशिल मंचरकर** यांनी त्यांची उमेदवारी दिलेल्या वेळेत रितसर मागे घेतली असल्याने क प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागे करीता **मा.मोटे किरण बाळासाहेब** हे एकच उमेदवार असल्याने **मा.मोटे किरण बाळासाहेब** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माक प्रभाग समिती सभापती पदावर बिनविरोध रितसर वैधरीत्या निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

----

यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी नवनिर्वाचित सभापती मा.मोटे किरण बाळासाहेब यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.)

सही/-
**( ओमप्रकाश बकोरीया )**
पिठासिन अधिकारी तथा
अतिरिक्त महापालिका आयुक्त,
पुणे महानगरपालिका,पुणे.

---

( नवनिर्वाचित सभापती **मा.मोटे किरण बाळासाहेब** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

ठराव क्रमांक- १११ | विषय क्रमांक- २
दिनांक- १०/४/२०१५ | विभाग- प्रशासन
सुचक- मा. प्रशांत शितोळे | अनुमोदक-मा.संजय काटे

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा.**(**पहिल्या** बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा.मोटे किरण बाळासाहेब** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(**मा.मोटे किरण बाळासाहेब**)
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६
क्र-कक्षेका/कावि/ ५२/२०१५
दिनांक- १०/०४/२०१५



प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.